**CNR No. MHSI01-0000172016**

## नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. ३/२०१६ मधील नि. २६, ३० व ३१ खालील सामाईक आदेश.

**(सुरेंद्र मळगांवकर – पुनर्वादी वि. रुक्मीणी राऊळ व. – उत्तरवादी)**

.......

१. पुनर्वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज नि . २६ हा उत्तरवादी क्र . ८ चे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करणेकरीता, अर्ज नि. ३० हा उपशमितचा आदेश रद्द करणेकरीता, अर्ज नि. ३१ हा सदरहू उत्तरवादी क्र. ८ चे वारस अभिलेखावर घेणेकरीता परवानगी मिळणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जांचे अवलोकन केले व पुनर्वादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. पुनर्वादींचे असे कथन आहे की, उत्तरवादी क्र. ८– काशिनाथ नारायण राऊळ यांचा मृत्यू दि. १६/०१/२००८ रोजी झाला. परंतु सदरहू उत्तरवादीचे मृत्यू प्रमाणपत्र उशिरा प्राप्त झाल्यामुळे, ते विहीत मुदतीत सदरहू उत्तरवादीचे वारस अभिलेखावर आणू शकले नाहीत. सदरचा विलंब क्षमापित व्हावा, अशी त्यांनी विनंती केली आहे. प्रस्तुत अर्जांस उत्तरवादी यांनी म्हणणे दाखल केलेले नाही.

४. अभिलेखावरुन असे दिसून येते की, पुनर्वादी यांनी, सदरहू उत्तरवादीचे मृत्यू प्रमाणपत्र उशिरा प्राप्त झाले असे कारण अर्जात नमूद केलेले आहे , परंतु त्यांनी सदरहू उत्तरवादीचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केलेले नाही . सदरहू उत्तरवादीचे प्रस्तावित वारस उत्तरवादी क्र. ८अ ते ८ड यांना नोटिसींची बजावणी झालेली आहे, परंतु ते प्रस्तुत अर्जाकामी हजर झाले नाहीत अथवा सदरहू उत्तरवादी मयत नाही किंवा ते त्यांचे वारस नाहीत, याबाबत म्हणणे दाखल करुन कोणताही आक्षेप नोंदविलेला नाही. उत्तरवादी क्र. ८इ यांना नोटिसीची बजावणी झालेली नाही व त्यांना नोटिसीची बजावणी होईपावेतो थांबण्याची आवश्यकता नाही, असे मला वाटते. जरी पुनर्वादी यांनी सदरहू उत्तरवादी क्र . ८ चे मृत्यू प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले नाही व विलंबाचा कालावधी जरी दिर्घ असला , तरी प्रस्तुतचा पुनर्वाद हा सन २०१६ चा म्हणजे जवळपास ७ वर्षांपेक्षा जास्त कालावधीचा असल्यामुळे, त्याचा लवकरात लवकर गुणदोषावर निर्णय होणे आवश्यक आहे व त्यामुळे न्यायहितार्थ पुनर्वादी यांना संधी देणे योग्य होणारे आहे. त्यामुळे सदरचे अर्ज मंजूर केल्यास उभयपक्षकारांचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलटपक्षी पक्षकारांच्या परस्परविरोधी कथनांचा विचार करुन पुनर्वाद गुणवत्तेवर निर्णित होण्यास मदतच होणारी आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करणेत येत आहेत. उत्तरवादी क्र. ८ चे वारस अभिलेखावर घेणेकामी झालेला विलंब क्षमापित करण्यात येत आहे. उपशमीतचा आदेश रद्द करणेत येत आहे.

२. उत्तरवादी क्र. ८ चे वारस अभिलेखावर घेण्यात यावेत.

३. पुनर्वादी यांनी नियमानुसार विहीत मुदतीत आवश्यक पूर्तता करावी आणि पुनर्वादपत्राची सुधारीत प्रत अभिलेखावर दाखल करावी.

SANJAY JUGALKISHOR BHARUKA

Digitally signed by SANJAY JUGALKISHOR BHARUKA
Date: 2023.11.03 11:20:46 +0530

(सं. जु. भारुका)

दिनांकः– ०१/११/२०२३

प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.